कुसुमाग्रज प्रतिष्ठान

# ‘जनस्थान’ पुरस्कार निवडीचे निकष आणि नियम

१ आपण एकूण तीन नावे पसंतीक्रमानुसार सुचवावयाची आहेत. सूचकाने स्वतःचे नाव सुचवू नये.

२ या पुरस्कारासाठी विद्यमान लेखकाच्या केवळ सर्जनशील साहित्याचाच विचार केला जाईल.

३ साहित्यिकांची नावे सुचविताना त्यांची सकस लेखन निर्मिती, एकूण मराठी साहित्यातील त्यांचे स्थान आणि त्यांच्या लेखनाचा समकालीन मराठी वाङमय प्रवाहावर पडलेला प्रभाव असा समग्र विचार अपेक्षित आहे.

४ मराठीत लेखन करणाऱ्या, भारतात किंवा भारताबाहेरील कोणत्याही देशात वास्तव्य करणा-या लेखकाचे नाव पुरस्कारासाठी ग्राह्य धरले जाईल. मात्र पुरस्कारासाठी निवडलेल्या साहित्यिकाने हा पुरस्कार प्रत्यक्ष उपस्थित राहून स्वीकारला पाहिजे हे लक्षात घ्यावे.

५ या शिफारसपत्रकातील ‘आपली भूमिका’ हा रकाना भरणे बंधनकारक नाही.

६ पुरस्काराच्या शिफारसीसंबंधी सर्व पत्रव्यवहार गोपनीय आहे हे कृपया लक्षात घ्यावे.